# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांक:08.04.2024 वार:सोमवार

---

1. पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी आज महाराष्ट्रात चंद्रपूर इथं प्रचाराचा आरंभ करणार
2. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारांसाठी अर्ज मागं घेण्याचा आज शेवटचा दिवस
3. तरुण आणि शहरी मतदारांना लोकसभा निवडणुकीच्या मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी निवडणूक आयोगातर्फे समाज माध्यमांवर अनेक नाविन्यपूर्ण मोहिमा सुरू.
4. तिन्ही सेनादलांची आज नवी दिल्ली इथं परिवर्तन चिंतन बैठक
5. शैक्षणिक साहित्याच्या कॉपीराइट उल्लंघनाविरुद्ध कडक कारवाईचा एन सी ई आर टी चा इशारा आणि
6. पूर्व आणि भारतात पुढील चार दिवस गारपीट आणि पावसाचा इशारा

**निवडणूक प्रचार**

लोकसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांचे प्रमुख नेते देशाच्या विविध भागात अनेक प्रचार सभा आणि पथ फेरी घेत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल पश्चिम बंगालमधील जलपाईगुडीच्या धुपगुरी ब्लॉकच्या झुमुर इथं जाहीर सभा घेतली. भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारच्या धोरणांमुळं गरिबांचं जीवन सुसह्य झालं आहे, असंही मोदी म्हणाले. यावेळी त्यांनी पश्चिम बंगाल राज्यातल्या सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकारवर केंद्राच्या कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे आणल्याचा आरोप केला. I.N.D.I.A. गटाकडं देशाचे नेतृत्व करण्याची दृष्टी नाही असंही मोदी म्हणाले.

**पंतप्रधान विदर्भदौरा**

पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात राजकीय हालचालींना वेग आला असून ठीकठिकाणी आता प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी आज चंद्रपूरमध्ये राज्यातल्या प्रचाराचा नारळ फोडणार आहेत. चंद्रपूर आणि गडचिरोली लोकसभा मतदारसंघातील भाजपा उमेदवारांच्या समर्थनार्थ ते संध्याकाळी प्रचारसभा घेणार आहेत. मोरवा विमानतळ मैदानावर त्यांची जाहीर सभा होणार असून राज्यातील भाजपाचे ज्येष्ठ नेते तसंच महायुतीतील घटक पक्षांचे नेतेही या सभेला उपस्थित राहणार आहेत. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार असून गडचिरोलीचे विद्यमान खासदार अशोक नेते गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढत आहेत. दरम्यान, रामटेक लोकसभा मतदारसंघातून उभे असलेले महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांच्यासाठी देखील पंतप्रधान मोदी येत्या दहा एप्रिलला प्रचारसभा घेणार आहेत. पूर्व विदर्भातील नागपूर, रामटेक, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि भंडारा-गोंदिया या पाच मतदारसंघात या महिन्याच्या 19 तारखेला मतदान होणार आहे.

**अर्ज-माघारी**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया आज संपत आहे. या टप्प्यातल्या उमेदवारांच्या अर्जांची छाननी शुक्रवारी जम्मू-काश्मीर वगळता इतरत्र पार पडली. या टप्प्यात, 12 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील 88 लोकसभा मतदारसंघांसह बाह्य मणिपूर लोकसभा मतदारसंघातील उर्वरित भागासाठी 26 एप्रिलला मतदान होणार आहे. दरम्यान भारतीय निवडणूक आयोगानं आगामी निवडणुकांमध्ये मतदारांचा मोठ्या प्रमाणात सहभाग वाढावा यासाठी युवा आणि शहरी मतदारांना जोडण्यासाठी समाज माध्यमांवर अनेक नाविन्यपूर्ण मोहिमा सुरू केल्या आहेत. तर टर्निंग एटिन

(Turning18) आणि यू आर द वन (You are the One) या सारख्या मोहिमांद्वारे आकर्षक संकल्पना तयार केल्या आहेत. तरुणांना आगामी निवडणुकीत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणं आणि मागील निवडणुकांमध्ये लक्षात आलेल्या शहरी आणि तरुणांच्या उदासीनतेच्या गंभीर समस्यांचं निराकरण करणं हे टर्निंग एटिन (Turning18) या मोहिमेचं प्राथमिक उद्दिष्ट आहे. तर यू आर द वन (You are the One) या मोहिमेचा उद्देश निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या विविध भागधारकांचे अमूल्य योगदान ओळखणं आणि साजरं करणं हे आहे.

**परिवर्तन चिंतन**

देशाच्या तीनही संरक्षण सेवा दलांचे परस्पर संबंध आणि अधिक दृढ करणं, देशाच्या रक्षणासाठी एकत्रित प्रयत्नांना बळकटी देणं आणि नव्या कल्पनांचा विचार करण्यासाठी नवी दिल्लीमध्ये आज तीनही सेवा दलांची आज नवी दिल्ली इथं परिवर्तन चिंतन बैठक होणार आहे. दिवसभर होणाऱ्या या बैठकीत सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान अध्यक्षपद भूषवतील. या बैठकीला तीनही संरक्षण दलांचे प्रमुख, संरक्षण मंत्रालयाचे प्रमुख अधिकारी आणि कर्मचारी वर्ग उपस्थित राहील अशा प्रकारची ही पहिलीच बैठक आज होत आहे. संरक्षण दलातील विविध विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचे आपापल्या क्षेत्रातील अनुभव आणि विचारांच्या देवाण घेवाणीतून संरक्षण विभागाच्या तीनही दलातील परस्पर संबंध दृढ करण्यास मदत होईल. भरतील संरक्षण दलाने आगामी काळातील युद्धासंसाठी स्वत:ला सुसज्ज करण्याच्या दृष्टीने मोठे बदल करण्यास सुरुवात केली असून तीनही सेवा दलांच्या परस्पर संबंधांना दृढ करणे हा त्याचाच एक भाग असल्याचं सूत्रांनी सांगितलं.

**NCERT-कॉपीराइट**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं आपल्या शैक्षणिक साहित्याच्या कॉपीराइट उल्लंघनाविरुद्ध एक सल्लावजा इशारा जारी केला आहे. कॉपीराइट परवानगी न घेता NCERT च्या पाठ्यपुस्तकांतील सामग्री व्यावसायिक वापरासाठी प्रकाशित करणारी कोणतीही व्यक्ती किंवा संस्थेवर कॉपीराइट कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई केली जाईल. लोकांनी अशा पाठ्यपुस्तकांमधील मजकूर चुकीचा असू शकतो त्यामुळं ही पुस्तकं किंवा कार्यपुस्तकं वापरु नयेत असंही आवाहन परिषेदनं केलं आहे. अशी पायरेटेड पुस्तकं कोणालाही आढळल्यास त्यांनी तत्काळ NCERT ला कळवावं, असा सल्लाही परिषदेनं दिला आहे.

**फ्रान्स स्फोट**

फ्रान्समध्ये काल रात्री पॅरिसमध्ये आठ मजली इमारतीला लागलेल्या आगीनंतर झालेल्या स्फोटात तीन जणांचा मृत्यू झाला. स्फोटाचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. इमारतीच्या सातव्या मजल्यावर आग लागण्यापूर्वी स्फोटाचा आवाज ऐकू आला. स्फोटाचे कारण शोधण्यासाठी घटनेचा तपास सुरू करण्यात आला आहे. स्फोटानंतर आजूबाजूच्या इमारतींमधील रहिवाशांनाही बाहेर काढण्यात आले. एखाद्या इमारतीच्या आत स्फोट होऊन अनेक लोकांचा मृत्यू होण्याची फ्रान्समध्ये गेल्या काही वर्षातीलच ही तिसरी घटना आहे.

**नक्षलवादी अटक**

महाराष्ट्रातल्या गडचिरोली जिल्ह्यात साडे पाच लाखांचं बक्षीस असलेल्या दोन महिला नक्षलवादी आणि जन मिलिटीयाचा सदस्य असलेल्या पिसा पांडू नरोटे याला अटक करण्यात आली आहे. अटक करणायात करण्यात आलेल्या दोन महिला माओवाद्यांची नावं काजल उर्फ सिंधू गावडे आणि गीता उर्फ सुकली कोरचा अशी असल्याचं पोलिसांनी सांगितलं असून पुढील तपास सुरू आहे.

**एनआयए**

राष्ट्रीय तपास संस्थेनं पश्चिम बंगालमधल्या भूपतीनगर इथं झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातल्या दोन आरोपींना काल अटक केल्यावर त्यांच्यावर बेकायदेशीर कारवाई केल्याच्या आरोपांचं खंडन केलं आहे. आपली कारवाई ही प्रामाणिक आणि कायदेशीररित्या बंधनकारक गुन्ह्याच्या चौकशीचा भाग म्हणून अनिवार्य आहेत, असं एनआयएनं एका निवेदनात म्हटलं आहे. हे प्रकरण गावठी बॉम्बच्या बनावटीशी संबंधित असून डिसेंबर 2022 मध्ये पश्चिम बंगालमधल्या नारुबिला गावात तीन लोकांचा मृत्यू

ज्या बॉम्बमुळे झाला होता त्याच्याशी हे प्रकरण संबंधित आहे, असंही राष्ट्रीय तपास संस्थेनं म्हटलं आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी एनआयएचं पथक नारुबिला गावात गेल्यावर एका अनियंत्रित जमावानं हिंसक हल्ला केला होता, असंही एनआयएनं सांगितलं.

**विश्व आरोग्य दिवस**

विश्व आरोग्य दिवस काल पाळण्यात आला. आरोग्यपूर्ण जीवनशैली आणि आरोग्य सुविधांची वैश्विक उपलब्धता याबाबत जनजागृती करण्यासाठी हा दिवस पाळण्यात येतो. 'माझं आरोग्य माझा अधिकार' ही यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची मध्यवर्ती संकल्पना आरोग्य सुविधांची गुणवत्ता, शिक्षण आणि असंसर्गजन्य रोगांना आळा घालणं या गोष्टींचं महत्त्व अधोरेखित करते. जीवनशैलीत महत्त्वाचे बदल करणं आणि योग सारख्या गोष्टींचा दैनंदिन जीवनात अंतर्भाव करण्यानं जीवनशैलीशी निगडीत आजारांवर मात करण्यास मदत होईल, असं मत एम्स रुग्णालयाच्या प्राध्यापिका डॉक्टर रीमा दादा यांनी काल आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केलं.

**हॉकी**

ऑस्ट्रेलियात पर्थ इथं सुरु असलेल्या भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या हॉकी सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात काल ऑस्ट्रेलियानं भारताचा 4-2 असा पराभव करत पाच सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामनाही जिंकला आहे.याच मैदानावर येत्या बुधवारी या मालिकेतला तिसरा सामना खेळला जाईल.

**टेनिस**

मॉन्टे कार्लो, मास्टर्स टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरी गटात भारताच्या सुमित नागल याला मुख्य फेरीत प्रवेश मिळाला आहे. अर्जेन्टिनाच्या फेसुंडो डियाज़ अकोस्टाचा अंतिम पात्रता फेरीत तीन सेट मध्ये त्यानं पराभव केला. गेल्या 42 वर्षात प्रथमच पुरुष एकेरी गटात भारताला मुख्य फेरीत प्रवेश मिळाला आहे. जागतिक क्रमवारीत 95 व्या स्थानावर असलेल्या सुमितनं 55 व्या स्थानावर असलेल्या अकोस्टाचा 7-5, 2-6, 6-2 असा पराभव केला. आता त्याचा सामना जागतिक क्रमवारीत 35 व्या स्थानावर असलेल्या इटलीच्या मॅथ्यु अर्नाल्डी याच्याबरोबर होणार आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार भारताच्या पूर्व आणि मध्य भागात तसेच भारतीय द्विपकल्पात पुढील चार दिवस वादळ, गारपीट आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्राच्या मराठवाडा आणि विदर्भ प्रांतात, झारखंड, पश्चिम बंगालमधील गंगेचं खोरं आणि ओडिशामध्ये येत्या 11 तारखेपर्यंत वादळ, विजांसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडेल. या काळात ताशी 50 किलोमीटर वेगाने वारे वाहतील असा अंदाज हवामान खात्यानं व्यक्त केला आहे. ओडिशा, मध्य प्रदेश, छत्तीसगढ आणि महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्यात काही ठिकाणी आज आणि उद्या गारपिटीची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.नमस्कार.